# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

१५ सप्टेंबर,२०१९



☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


# पोलीस मुख्यालय येथे ३६४ नवनिर्मीत सदनिकांचा उद्घाटन समारंभ संपन्न

### लवकरच ४१६ नविन सदनीका तयार करून देण्याची पालकमंत्र्यांनी केली घोषणा

दिनांक १४/०९/२०१९ रोजी पोलीस मुख्यालय चंद्रपुर येथे नवनिर्मीत भव्य अशा ३६४ पोलीस सदनिका (क्वार्टर) चे मा.ना.श्री. सुधीर मुनगंटीवार, मंत्री वित, नियोजन व वने तथा पालकमंत्री चंद्रपुर जिल्हा यांचे हस्ते उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

चंद्रपुर शहरात पोलीस मुख्यालय येथे ३६४ सदनिका उभारण्याचा भुमिपुजन सोहळा सुध्दा मा. पालकमंत्री महोदय यांचे हस्ते दिनांक ४ सप्टेंबर २०१६ रोजी पार पाडला होता. भुमिपुजन होताच या ३६४ सदानिकाचे कामकाज सुरू झाले आणि दोन वर्षातच १०१ कोटीच्या या प्रोजेक्टचे काम पुर्णत्वास येवुन एकुण १३ सात मजली इमारती तयार झाल्या. सदर इमारती या अत्याधुनिक सोयीने सुसज्ज असुन मुंबई पुणे यासारख्या मोठया शहरातील फ्लॅटस्किम प्रमाणे त्यातील सदनीकांची रचना तयार करण्यात आली आहे. ज्यातील ११ बिल्डींग या पोलीस मुख्यालय येथे तर २ बिल्डींग गिरनार चौक येथे उभारल्या गेल्या आहे. प्रत्येक इमारतीमध्ये ये—जा करणे साठी दोन लिफट् बसविण्यात आल्या असुन इमारतीच्या आवारामध्ये लॉन व लहान मुलांसाठी उद्यान सुध्दा तयार करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे प्रास्तावीक पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये संपुर्ण चंद्रपुर पोलीस दल हे भविष्यकाळात आणखी स्मार्ट वर्क करेल, आणि आतापर्यंत चंद्रपुर पोलीस दलासाठी जे काही नवनवीन प्रोजेक्ट तयार केले आहे त्याबाबतची माहिती सांगुण नवनिर्मीत क्वार्टरर्स मध्ये राहण्याकरीता जाणाऱ्या प्रत्येक पोलीस कुटुंबीयाना इमारातीची देखरेख करणे व परिसराची स्वच्छता ठेवण्याचे आवाहन केले. सदर कार्यक्रमाचे उदघाटक मा. पालकमंत्री महोदय त्यांनी आपले अध्याक्षीय भाषण करतांना उद्घाटन समारंभानिमीत्य शुभेच्छा देत, पोलीस विभागाने जिल्हयाचे नाव संपुर्ण महाराष्ट्रात नावलौकीक करावे असे आवाहन करून पुढिल टप्प्यात चंद्रपुर पोलीस दलाकरीता आणखी ४१६ पोलीस क्वार्टर नव्याने बांधण्याची घोषणा केली. सोबतच चंद्रपुर पोलीस दलातील खेळाडु हे आतंरराष्ट्रीय पातळीवर जावे याकरीता पोलीसांसाठली सिंथेटीक ट्रॅक, बॅडमिंटन

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

कोर्ट आणि इनडोअर फायरिंग रेंज तयार करण्याची घोषणा करून त्यासाठी २१ कोटी निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा केली.

मान्यवरांच्या हस्ते प्रातनिधिक स्वरूपात काही पोलीस कर्मचाऱ्यांना क्वार्टरची चाबी देवुन क्वार्टर वाटप करण्यात आले. व हा संपुर्ण प्रोजेक्ट तयार करून देणारे पवार पाटकर कंस्ट्रक्शन कंपनी नाशिक येथील इंजीनिअर व त्यांचे सहकारी आणि आर्किटेक्ट धवड ॲन्ड असोसिऐट्स यांचा मान्यवरांच्या हस्ते शालश्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणुन मा.सौ. अंजली घोटेकर, महापौर चंद्रपुर मनपा, श्री. ब्रिजभुषण पाझारे, समाजकल्याण, जि.प. सभापती चंद्रपुर, श्री. राहुल पावडे, स्थायीसमिती सभापती मनपा, चंद्रपुर, श्री. हरिष शर्मा नगराध्यक्ष, बल्लारशाह, श्री. दिपक सोनटक्के, अधीक्षक अभियंता पोलीस हाउसिंग, नागपुर विभाग, पोलीस अधीक्षक डॉ. श्री. महेश्वर रेडड्ी, अपर पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत खैरे, पोलीस उपअधीक्षक गृह श्री. शेखर देशमुख, एसडीपीओ चंद्रपुर श्री. नांदेळकर, एसडीपीओ मुल श्री. अनुज तारे, एसडीपीओ राजुरा श्री. स्वप्निल जाधव, आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन पोउपनि. श्री. विकास मुंढे व आभार प्रदर्शन पोलीस उपअधीक्षक गृह श्री. शेखर देशमुख यांनी केले असुन कार्यक्रमादरम्यान पोलीस कुटुंबीय आणि पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

———————————————————————————————